Chairman
Vidyadhar Anaskar
M.Com., D.T.L., D.L.L. & L.W., LL.B.

Vice Chairman
Ramakant Khetan
B.Sc., LL.B.

Chief Executive & Secretary
Sou. Sayali Bhoir
B.Com., G.D.C. & A., LL.B., C.A.I.I.B

# The Maharashtra Urban Co-op. Banks' Federation Ltd.

(Regd. No. BOM-GNL-8 of 9th March 1979)

Bharatiya Krida Mandir, 4th Floor,
Wadala, Mumbai - 400 031. P. B. No. 7120,
Tel. : 022 - 2413 5797, Fax : 022 - 2415 1185
E-mail : admin@mucbf.com ● www.mucbf.com

परिपत्रक: एमयुसीबीएफ/ ३९/७/ २०१७-१८
दिनांक: २८ जून, २०१७

**प्रति,**
**मा.अध्यक्ष / मुख्य कार्यकारी अधिकारी**
सर्व प्राथमिक नागरी सहकारी बँका

विषय: **राज्य शासनाची शेतकऱ्यांची शेती विषयक कर्जमाफी योजना.**

**महोदय,**

आपणांस माहीत आहेतच की, कृषी क्षेत्रावरील संकट लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य शासनाने राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शेती विषयक कर्जमाफी योजना जाहीर केली आहे. कर्जमाफीसाठी नेमलेल्या उच्चस्तरीय सुकाणू समितीने कर्जमाफीसंदर्भात घेतलेल्या निर्णयानुसार राज्यातील शेतकऱ्यांनी बँकांकडून घेतलेल्या शेती विषयक कर्जांना तत्त्वत: माफी देण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे.

वरील पार्श्वभूमीवर आपणांस कळविण्यात येते की, आपल्या बँकेमार्फत शेतकऱ्यांना कृषी कर्जे तथा शेतीपुरक कर्जे देण्यात आली असतील, तर त्या कर्जांची मंजूर रक्कम, शिल्लक रक्कम आणि थकीत रक्कमेचा सविस्तर तपशील खाली दिलेल्या तक्त्यामध्ये नमूद करुन फेडरेशनकडे तातडीने सादर करावा. जेणेकरुन कृषी कर्जमाफी योजनेमध्ये फेडरेशनच्या सभासद नागरी सहकारी बँकांचाही समावेश करणे संदर्भात शासनाकडे पाठपुरावा करता येईल.

| ३१/०३/२०१७ ची स्थिती ( कृषी कर्जे) | | | | (₹ लाखात) |
|---|---|---|---|---|
| कर्जदार | मंजूर रक्कम | शिल्लक | येणे व्याज | थकबाकी |
| | | | | |

| ३१/०३/२०१७ ची स्थिती ( शेतकीपूरक कर्जे) | | | | (₹ लाखात) |
|---|---|---|---|---|
| कर्जदार | मंजूर रक्कम | शिल्लक | येणे व्याज | थकबाकी |
| | | | | |

कळावे.

आपली विश्वासू

**सौ.सायली भोईर**
मुख्य कार्यकारी व सचिव